13:27:42

नि.दि. दावा क्र.६५/२००९

अब्दूल समद निजामोद्दीन वि अब्दूल वाहेद शेख अमिर

निशाणी क्र. ७४ लगत

**प्रतिवादीचा साक्षीदार क्र.१ चा पुढील उलटतपास विधिज्ञ श्री.पी.के.निकम यांच्यामार्फत**

३६. साक्षीदाराला उलटतपासा दरम्यान सिवील अर्ज ११८३४/२००९ मधील याचिकेचा आदेश दाखविण्यात आला. मला हे सांगता येणार नाही की, माझ्या वकिलांमार्फत आम्ही मा.उच्च न्यायालयामध्ये दिवाणी अर्ज क्र.११८३४/२००९ हा याचिका क्र.६७७९/२००९ मध्ये दाखल केलेला होता किंवा कसे. (सदर दस्त हे सहि शिक्याची नक्कल असल्यामुळे त्याला **निशाण क्र.१९२** देण्यात येते.) हे खरे नाही की, आमचा सदरचा अर्ज नामंजूर करण्यात आला होता व मनाईहुकूम कायम करण्यात आला होता. मला हे सांगता येणार नाही की, वादी यांना मिळालेला मनाईहुकूम रद्द झाला होता किंवा कसे. हे खरे नाही की, वादी यांनी दावा मिळकतीचा नामतराणासाठी अर्ज दाखल केला होता व त्यामध्ये मी माझा जबाब दिला होता. हे खरे नाही की, त्या कार्यावाहीमध्ये माझ्या जबाबाच्या आधारे अहवाल सादर करण्यात आला व वाटणी पत्राचा उल्लेख करण्यात आला.

३७. साक्षीदाराला उलटतपासादरम्यान काही कागद दर्शविण्यात आलेले आहे त्याच्या यादीला **निशाण क्र.१९३** देण्यात येते. सदर यादीतील दस्त क्र.१ ते ३ साक्षीदाराला दाखविण्यात आले असता त्याने सदर दस्त नाकारलेले आहेत. सदर दस्त हे सार्वजनिक स्वरुपाचे दस्त असल्यामुळे त्याला **निशाण क्र.१९४ ते १९६** देण्यात येते. सिरजगाव येथे माझी स्वतःची १६.५० एकर इतकी मिळकत होती. मला हे सांगता येणार नाही की, मिळकत रावसाहेब बाबासाहेब दहातोंडे यांना विकली किंवा कसे. हे खरे नाही की, मला आता दाखविण्यात आलेल्या नोंदणीकृत खरेदी पत्र क्र.५२५/२००५ दि.२९.०१.२००५ वरील ३ नंबरच्या पानावर माझी सही आहे.

आता मला दाखविण्यात आलेल्या सदर खरेदी पत्रातील पान क्र.६ वर असलेले छायाचित्र माझे नाही. (सदर खरेदी पत्र सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.१९७** देण्यात येते.)

३८. मला हे सांगता येणार नाही की, आता मला दाखविण्यात आलेला फेरफार क्र.७०१ शिरसगाव हा दस्त क्र.५२५/२००५ बाबत करण्यात आला होता किंवा कसे.(सदर खरेदी पत्र सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.१९८** देण्यात येते.) मला हे सांगता येणार नाही की, आता मला दाखविण्यात आलेले खरेदी पत्र क्र.५२६/२००५ दि.२९.०१.२००५ मी संदिप रावसाहेब दहातोंडे यांना २ हे ६४ आर बाबत करुन दिलेले होते किंवा कसे. या दस्तातील फोटो व सही माझी आहे किंवा कसे हे मी दस्त माझ्या अचानक माझ्यासमोर आल्यामुळे मी सांगू शकत नाही. (सदर खरेदी पत्र सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.१९९** देण्यात येते.) मला हे सांगता येणार नाही की, आता मला दाखविण्यात आलेला फेरफार क्र.७०२ शिरसगाव हा दस्त क्र.५२६/२००५ बाबत करण्यात आला होता किंवा कसे.( सदर फेरफार सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.२००** देण्यात येते.)

३९. मला हे सांगता येणार नाही की, आता मला दाखविण्यात आलेले खरेदी पत्र क्र.५०१०/२००३ दि.२६.१२.२००३ मी युवराज वंसतराव सातदिवे यांना १ हे २० आर बाबत करुन दिलेले होते किंवा कसे. या दस्तातील फोटो व सही माझी आहे किंवा कसे हे मी दस्त माझ्या अचानक माझ्यासमोर आल्यामुळे मी सांगू शकत नाही. (सदर खरेदी पत्र सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.२०१** देण्यात येते.) मला हे सांगता येणार नाही की, आता मला दाखविण्यात आलेला फेरफार क्र.६३४ शिरसगाव हा दस्त क्र.५०१०/२००३ बाबत करण्यात आला होता किंवा कसे.(सदर फेरफार सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.२०२** देण्यात येते.

४०. मला हे सांगता येणार नाही की, आता मला दाखविण्यात आलेले खरेदी पत्र क्र.४२७०/२००२ दि.१२.०९.२००२ मी सागर कारभारी ठोकळ यांना

आठेगाव येथील १ हे २० आर बाबत करुन दिलेले होते किंवा कसे. या दस्तातील फोटो व सही माझी आहे किंवा कसे हे मी दस्त अचानक माझ्यासमोर आल्यामुळे मी सांगू शकत नाही. (सदर खरेदी पत्र सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.२०३** देण्यात येते.) मला हे सांगता येणार नाही की, आता मला दाखविण्यात आलेला फेरफार क्र.९८५ आठेगाव हा दस्त क्र.४२७०/२००२ बाबत करण्यात आला होता किंवा कसे.(सदर फेरफार सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.२०४** देण्यात येते.

४१. मला हे सांगता येणार नाही की, आता मला दाखविण्यात आलेले खरेदी पत्र क्र.४२७१/२००२ दि.१२.०९.२००२ मी मीराबाई कारभारी ठोकळ यांना आठेगाव येथील १ हे ४१ आर बाबत करुन दिलेले होते किंवा कसे. या दस्तातील फोटो व सही माझी आहे किंवा कसे हे मी दस्त अचानक माझ्यासमोर आल्यामुळे मी सांगू शकत नाही. (सदर खरेदी पत्र सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.२०५** देण्यात येते.) मला हे सांगता येणार नाही की, आता मला दाखविण्यात आलेला फेरफार क्र.९८६ आठेगाव हा दस्त क्र.४२७१/२००२ बाबत करण्यात आला होता किंवा कसे.(सदर फेरफार सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.२०६** देण्यात येते.

४२. मला हे सांगता येणार नाही की, आता मला दाखविण्यात आलेले खरेदी पत्र क्र.१७७७/२००२ दि.१६.०४.२००२ मी दिपक आबाराव वाळुंजे यांना आठेगाव येथील १ हे २१ आर बाबत करुन दिलेले होते किंवा कसे. या दस्तातील फोटो व सही माझी आहे किंवा कसे हे मी दस्त अचानक माझ्यासमोर आल्यामुळे मी सांगू शकत नाही. (सदर खरेदी पत्र सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.२०७** देण्यात येते.) मला हे सांगता येणार नाही की, आता मला दाखविण्यात आलेला फेरफार क्र.९८३ आठेगाव हा दस्त क्र.१७७७/२००२ बाबत करण्यात आला होता किंवा कसे.(सदर फेरफार सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.२०८** देण्यात येते.

४३. हे खरे नाही की, निशाण क्र.६६ वाटणीपत्राधारे मिळकत मला आली

होती व त्यानंतर मी त्याची विक्री केली. हे खरे नाही की, वाटणी पत्र सिध्द होईल म्हणूण मी वाटणीपत्र आणि मी केलेले खरेदी पत्र नाकारत आहे. हे खरे नाही की, वाटणी पत्र झाल्यापासून दावा मिळकतीवरती आमचा कायदेशीर अधिकार नाही.

४४.    मला हे आठवत नाही की, पोलीस स्टेशनमध्ये केलेल्या तक्रारी व्यतिरिक्त दिवाणी व फौजदारी न्यायालयामध्ये शेख असद व शेख अमिन यांच्या विरुध्द मी काही कार्यवाही केले आहे किंवा कसे. हायकोर्टात मनाई आदेशा बाबात झाल्या आदेशाविरुध्द आम्ही सर्वोच्च न्यायालयात गेलेलो नाही. हे खरे नाही की, माझ्या सरतपासात नमूद केल्याप्रमाणे माझ्यावर आणि माझ्या पत्नीवर हल्ला केल्याबाबतचे कथन खोटे आहे. मी ईस्लामिक कायदा थोडाफार वाचलेला आहे. मी ईस्लामिक कायदयाबाबत वाटणीपत्राबाबत वाचले होते मला त्याचे कारण सांगता येणार नाही. मला हे सांगता येणार नाही की, वादीने कोणत्या महत्वाच्या बाबी लपविलेल्या आहेत त्याचा उल्लेख माझ्या सरतपासात आहे. हे खरे नाही की, माझा दावा मिळकतीशी काही संबंध नाही. दावा मिळकत माझ्या ताब्यात असल्याबाबत त्याचे कागद पत्र दाखल केलेले आहे. त्याबाबत जिल्हाधिकारी व उपजिल्हाधीकारी यांचे आदेश चॅप्टर केसचे आदेश आहे. हे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्र खोटया माहितीवर आधारीत राहून दाखल केले आहे. हे खरे नाही की, वादी यांची मिळकत मला हडपयाची असल्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, वादींना त्रास देण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, मी वादींना सुरुवातीपासून त्रास देत असल्यामुळे वादींनी दावा दाखल केला.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2024.11.08 10:38:50 +0530

कन्नड.    (वि. द. पाटील)

दिनांक : ०७/११/२०२४    दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कन्नड.

02:08:27 PM